# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

---

**दिनांक ०७.१०.२०२६ बुधवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०६.१०.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ०५ केसेसमध्ये ०७ ईसमावर कारवाई करून एकुण २,२४,२२०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला. जुगार कायद्यान्वये ०१ केसमध्ये ०१ ईसमावर कारवाई करून एकुण ७४५/—रू. चा मुद्देमाल जप्त केला.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये ४३ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये १७ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये १०३ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये ३२८ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ६२ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये १०३ केसेस, ड्रायव्हींग विदाऊन युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये १२ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ५८ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ०६ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये २१ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये ३३ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १,१५६ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे ०७ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये ३३ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण २,०८० वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ७,९१,२००/—रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) यशोधरानगर पोलीसांची कामगीरी :— म.को.का. अंतर्गत गुन्ह्यातील पाहिजे आरोपीस अटक.**

पोलीस ठाणे यशोधरानगर येथे दाखल कलम १०९(१), ११८(१), ३०९(४), ३५२, ३(५) भा.न्या.सं. सहकलम ३(१)(ii),३(२),३(४) म.को.का. अन्वये गुन्ह्यातील आरोपी टोळीसदस्य नामे वसीम उर्फ शिबू उर्फ अहमद समसुद्दीन अहमद, रा. टिपू सुलतान चौक, यशोधरानगर, नागपूर यास मा. न्यायालयातुन जामीन मंजुर झाला असता, मा. न्यायालयाने त्याचा जामीन रद्द केल्यापासून तो फरार झाला होता.

आरोपीचे शोधार्थ आरोपीचा पाठपुरावा करीत असता, यशोधरानगर पोलीसांनी तांत्रीक तपास केला असता, दिनांक ०६.१०.२०२६ रोजी यशोधरानगर पोलीसांना पेट्रोलींगदरम्यान खात्रीशीर माहिती मिळाली की, नमुद आरोपी हा पोलीस ठाणे हद्दीत पांडे वस्तीकडून मेट्रो स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्यावरील कंपाऊंडजवळ उभा आहे. अशा सुचनेवरून नमुद ठिकाणी गेले असता, प्राप्त वर्णनाचा ईसम दिसून आला. त्याचेकडे जात असता, तो पोलीसांना पाहुन पळून जाणेचे तयारीत असता, त्यास घेराव घालून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता

विचारले असता, त्याने त्याचे नाव वसीम उर्फ शिबू उर्फ अहमद समसुद्दीन अहमद, वय ४१ वर्षे, रा. टिपू सुलतान चौक, यशोधरानगर, नागपूर असे सांगितले. आरोपीस वर नमुद गुन्हे संबंधाने अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग), मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहायक पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. युनुसचॉद शेख, पोउपनि. अनंत पाटील, पोहवा. राहुल बोंदरे, पोअं. संदीप वानखेडे, मनिष झरकर, शितेश चौरशिया व भुषन येरोजवार यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे गिट्टीखदान :—शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक ०६.१०.२०२६ चे १५.२० ते १५.५५ वा. चे दरम्यान, गिट्टीखदान पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, गंगानगर, मोकळे मैदान परिसरात एक ईसम ज्याने अंगात पिवळ्या रंगाची टि—शर्ट घातलेली असून, तो तलवार सारखे शस्त्र बाळगुन आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, प्राप्त वर्णनाचा इसम मैदानात बसलेला दिसून आला. त्याचे जवळ जात असता तो पोलीसांना पाहुन पळू लागला. पोलीसांनी त्याचा पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव सोहेल तौफिक शेख, वय २१ वर्षे रा. जगदिशनगर शिव मंदीर जवळ काटोल रोड, गिट्टीखदान असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आंत लपविलेली एक लोखंडी तलवार किंमती ३००/— रू. ची मिळून आल्याने जप्त करण्यात आली.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने तलवार बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोअं. आकाश लोथे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे पोउपनि. रामेश्वर जाधव यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म. पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे बेलतरोडी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २६.०९.२०२६ चे ०७.३० वा. ते दिनांक ०६.१०.२०२६ चे ०५.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत प्लॉट क्र. १२, साईकृपा सोसायटी, म्हाडा कॉलोनीजवळ, नरेंद्र नगर, नागपूर येथे राहणारे फिर्यादी धवल नरेंद्र कडू, वय ४२ वर्ष हे आपले राहते घराला कुलुप लावुन कामानिमित्य मुंबई येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराला लावलेले सि.सि.टी.व्हि. बंद करून, घराचे मुख्य दाराचे कडी कोंडा व कुलूप तोडून घराचे आंत प्रवेश करून, कपाटातील सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने व वस्तु किंमती ४,४८,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

यांप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि. शिरिष सलगर ९६७३९९१४०७ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे लकडगंज</u> :—** दिनांक ०६.१०.२०२६ चे २१.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत, वर्धमान नगर पावर हाऊस चौक, श्री राधे अपार्टमेन्ट समोरील रोडवरील एक झाडाखाली कचऱ्यात एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ३० ते ३२ वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकाचे वर्णन— वय ३० ते ३२ वर्षे, अंगात—क्रिम रंगाची जर्शी व कथ्या रंगाचे लोअर तसेच, RKG नावाची अंडरवेअर घातलेली असून, पायात प्लास्टीकची चप्पल घातलेली आहे. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे लकडगंज येथे संपर्क साधावा.

यांप्रकरणी फिर्यादी भरत धनेश्वर सेवक, वय ५१ वर्षे, रा. प्लॉट नं. ६/३१, हिवरी नगर, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे लकडगंज येथे मपोउपनि. सोनल शिंदे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. अति. मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब—४७वे कोर्ट, मुंबई. | २२५/PW/ २०२० | कलम ४२०, १२०(ब),३४ भा.दं.वि. | १) लालचंद बरकतलाल मालू<br>२) बजरंगलाल बरकतलाल मालू<br>३) मुरली मनोहर मालू तिघेही रा. राधा हाऊस, २४१ ईस्ट हाऊस नगर, नागपूर.<br>किंवा,<br>१४१८, देशपांडे ले—आऊट, वर्धमान नगर, नागपूर. | १५.१०.२०२६ |

स्वा/—

( अंकुश राठोड )

पोलीस उप निरीक्षक,

पोलीस जनसंपर्क अधिकारी,

नागपुर शहर.